लोकमत

## पाच महिने दाखवणार प्रात्यक्षिके : डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयातर्फे ग्रामीण कृषी कार्यानुभव उपक्रम

# मळकर्णेत कृषीदूत दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगे :** सुळकर्णे येथील डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयातर्फे ग्रामीण कृषी कार्यानुभव हा कार्यक्रम सुरु करण्यात आला असून मळकर्णे या कृषीप्रधान गावात १३ कृषीदूत दाखल झाले आहेत. या कार्यक्रमांतर्गत कृषी महाविद्यालयातील चतुर्थ वर्षाचे विद्यार्थी पुढील पाच महिने गावामध्ये राहून शेतकऱ्यांना विविध प्रात्यक्षिके करून दाखविणार आहेत.

जून महिन्यापासून या उपक्रमाला सुरुवात झाली असून या कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून विस्तार शिक्षण विभागातील डॉ. राकेश कवळे तर कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. प्रशांत पाटील हे काम पाहाणार आहेत. या उपक्रमांतर्गत पीक लागवडीच्या विविध पद्धती, खतांचे व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, माती परीक्षण, नवीन बियाणे, कीड व रोग नियंत्रण, गांडूळ खत, मशरुम तयार करणे इत्यादी कार्यक्रम तसेच सामाजिक दृष्टिकोनातून देखील काही कार्यक्रम आखले जाणार आहेत. यामध्ये वृक्ष लागवड, रक्तदान शिबिर यांचा समावेश आहे.



मळकर्णे येथील शेतकऱ्यांसमवेत कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी.

मळकर्णे गावामध्ये कृषीदूत म्हणून अक्षय परब काम पाहाणार आहेत. तसेच भूषण फळ्देसाई, दिनेश रेकडो, सर्जियो फर्नांडिस, नितीन, रवी, शोधाली, अभिषेक कांबळी हे सहकार्य करतील.

मळकर्णे परिसरातील शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे फा. ऑल्वीन डिसोझा यांनी केले आहे.